Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 11 No - 1 Issue - 31 Jan.-April 2023 ISSN-2347-9639

40 Years

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

IIJIF Impact Factor 2.283



महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे

संपादक
प्राचार्य डॉ. प्रमोद पवार
प्राचार्य डॉ. मनोहर पाटील । प्राचार्य डॉ. बाळ कांबळे । डॉ. लियाकत खान । डॉ. विठ्ठल दहिफळे

अथर्व

# ※ अनुक्रमणिका ※


१. भारताचे परराष्ट्रीय धोरण आणि दक्षिण आशिया ........ १
*डॉ. बी. पी. गरुडे*

२. भारताच्या अंतर्गत सुरक्षिततेसमोर भ्रष्टाचार एक आव्हान ........ ११
*कल्पना डी. निकम*

३. भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील आव्हान ........ १५
*प्रा. डॉ. अनिल रा. कडू*

४. रशिया आणि युक्रेन युद्धामुळे बदलती जागतिक व्यवस्था आणि भारत ........ १९
*प्रा. पंकज लक्ष्मण सोनवणे*

५. जागतिकीकरणानंतर भारतातील आदिवासी समुदायाची धोरणे : पेसा धोरणाचा एक चिकित्सक अभ्यास ........ २३
*खोकले डी. एल.*

६. भारत आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्र ........ २८
*श्री. राजेंद्र बाळासाहेब म्हमाणे*

७. प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना (सार्क) आणि भारत एक चिकित्सक अभ्यास . ३२
*डॉ. आकाश शेषराव बांगर*

८. सार्क संघटना आणि भारताची भूमिका ........ ३५
*डॉ. ममता विजयराव पाथ्रीकर*

९. संयुक्त राष्ट्रे आणि शांतता रक्षण ........ ४१
*डॉ. गिरीश महादेव कुलकर्णी*
*डॉ. प्रमोद राजेंद्र तांबे*

१०. भारत-चीन संघर्ष व सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास ........ ४३
*तृप्ती रमेश मोरे*

११. भारताचे परराष्ट्र धोरण आणि भाजप शासन ........ ४६
*प्रा. डॉ. जयराम श्रीरंग ढवळे*

१२. सार्क, आसियान, जी २०, क्वाड, ब्रिक्स, एससीओ या सारख्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये भारताचा सहभाग ........ ४९
*कीर्ती विजय करंजावणे*

१३. भारत-अमेरिका संबंधातील चढ-उतार ........ ५२
*प्रा. डॉ. धुमाळे धोंडीराम कामाजी*

१४. आंतरराष्ट्रीय राजकारणात सार्क संघटनेची भूमिका ........ ५५
*प्रा. डॉ. गोडगे डी. एस.*

१५. भारत आणि जागतिक महासत्ता : एक विश्लेषणात्मक अभ्यास ........ ५९
*प्रा. डॉ. संभाजी तनपुरे*

# भारताचे परराष्ट्र धोरण आणि भाजप शासन

प्रा. डॉ. जयराप श्री
राज्यशास्त्र विभागप्रमुख, कला, विज्ञान व वाणिज्य म
शिवाजीनगर, गढी, ता.गेवराई,

**प्रस्तावना :**

भारताची ओळख जगात शांतताप्रिय राष्ट्र म्हणून आहे. सन २०१४ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर केंद्रामध्ये भक्कम, स्थिर शासन स्थापन झाले व पंतप्रधान म्हणून एक मुखाने नरेंद्र मोदी यांची पंतप्रधानपदी निवड करण्यात आली. या शासनाच्या शपथविधीला सार्क राष्ट्रांच्या प्रमुखांना बोलावून विदेश नीतीचे एक नवे धोरण मांडण्यात आले. भारतातील नवीन सरकार दक्षिण आशियातील नवीन राष्ट्रांबरोबर नवे संबंध प्रस्थापित करत आहे, अशा प्रकारचा संदेश आंतरराष्ट्रीय राजकारणात देण्यात आला. १९९१ नंतर अर्थमंत्री मनमोहन सिंग यांच्या कालखंडात आर्थिक उदारीकरण व जगातील बदलते व्यापारी प्रवाह यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडवून आणला. भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी जुळवून घेणारी आहे, अशी भारताची प्रतिमा आंतरराष्ट्रीय पातळीवर तयार झाली. जागतिक स्पर्धेत आगेकूच करण्यासाठी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर भारताने अनेक अडथळ्यांच्या शर्यतींना तोंड देत स्वावलंबनचा मार्ग स्वीकारला. सद्य:स्थितीत जगातील अनेक बलाढ्य राष्ट्र मंदीच्या खाईत होरपळत असताना दिसून येतात. मात्र अशा परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्था तेवढ्याच सक्षमपणे, ताकदीनिशी स्वत:च्या सामर्थ्यांच्या जोरावर व मुत्सद्दी धोरणामुळे टिकून आहे.

**भारताचे परराष्ट्र धोरण :**

कोणत्याही देशाची परराष्ट्र नीती ही त्या राष्ट्राची तत्कालीन राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती, पारंपरिक विचारधारा, त्या राष्ट्राचे हितसंबंध व गरजा, तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थिती यातून साकार होते. राष्ट्राचे हितसंवर्धन व्हावे हा एकमेव उद्देश परराष्ट्र धोरणासमोर असतो. भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मतानुसार ''भारत की विदेश निती की जडे भारत की सभ्यता और परंप भारत के स्वतंत्रता संग्राम, इसकी भौगोलिक स्थिती शांती, सुरक्षा विकास तथा जगत में एक स्थान भारत की तलाश में स्थित है।'' 'शांतताप्रिय भार विविधतेने नटलेल्या पारंपरिक व सांस्कृतिक, संग्रामातील संघर्ष, वैविध्यपूर्ण भौगोलिक स्थिती, नागरिकाची सुरक्षा व विकास आणि जगात भारता स्थान निर्माण करणे हेच भारताच्या परराष्ट्र धोरणाचे आहे. ४ डिसेंबर १९४७ रोजी घटना समितीपुढे बोल पंडित जवाहरलाल नेहरू म्हणले की, 'राष्ट्रहिताला नीती सर्वाधिक पोषक ठरेल हे अचूक ओळखू दृष्टीने धोरण निश्चित करणे, हेच परराष्ट्र धोरणाचे कार्य होय.''[२] राष्ट्रहित हे एकमेव ध्येय ठेवत त्या कार्य करणे. भारताची परराष्ट्रानीती ही स्वातंत्र्य प्राप्त निश्चित केली गेली.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये :**

१) आपल्या प्रादेशिक अखंडत्वाचे अबाधित्वाचे संरक्षण करणे.

२) जागतिक शांतता टिकवून आंतरराष्ट्रीय सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न क

३) धोरण निर्धारणाचे स्वातंत्र्य टिकवणे.

४) सर्व राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध ठेवणे, ते टिक सहकार्य प्रस्थापित करणे.

५) भारताचा आर्थिक विकास साधणे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आजपर्यंत जवळजवळ राष्ट्रांना भेट दिली.[३] यात विकसित व विकसनशील राष्ट्र समावेश आहे. सर्वच क्षेत्रात सर्व बाजूंनी सुधारणा हो असल्या तरी सरकारचे मुख्य यश आंतरराष्ट्रीय संबं आहे. प्रत्येक राष्ट्रासोबत सलोख्याचे संबंध निर्माण क भारताने आंतरराष्ट्रीय संबंधात वेगळी प्रतिमा निर्माण क

**आंतरराष्ट्रीय नेतृत्व :**

परराष्ट्र धोरणात अंमलबजावणी व निर्मितीसाठी काही व्यक्ती महत्त्वाच्या असतात. देशातील परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून त्या व्यक्तीच्या करिश्म्याभोवती परराष्ट्र धोरण आपलं वेगळं स्थान निर्माण करीत असतं. सुषमा स्वराज या स्वर्गीय इंदिरा गांधींनंतरच्या पहिल्या महिला विदेश मंत्री, लोकसभेतील माजी विरोधी पक्षनेत्या, परराष्ट्र मंत्रालय स्वीकारल्यापासून आपल्या वीस महिन्यांच्या कार्यकाळात एकूण २९ राष्ट्रांना त्यांनी भेटी दिल्या. मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणाचे पहिल्या १०० दिवसांचे कार्य (Fast Track Diplomacy) 'फास्ट ट्रॅक डिप्लोमसी' ही पुस्तिका सुषमा स्वराज यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली.[४] सुब्रमण्यम जयशंकर अमेरिकेतील भूतपूर्व भारतीय राजदूत होय. २८ जानेवारी २०१५ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या यशस्वी भारत भेटीनंतर भारताचे परराष्ट्र सचिव म्हणून जयशंकर यांना बढती देण्यात आली. अजित कुमार डोवाल यांची भारताचे पाचवे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून ३० मे २०१५ रोजी निवड करण्यात आली. त्यांनी पाकिस्तानमध्ये सात वर्षे गुप्तरीत्या काम केले आहे.[५] सुरक्षा संदर्भात अनेक घटनांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**भारत आणि शेजारील राष्ट्रे :**

नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची शपथ घेण्यापूर्वीच शेजारी राष्ट्रांना शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देऊन सर्वोत्कृष्ट व धडाडीचे पाऊल टाकत आपल्या नव्या सरकारच्या कारकिर्दीची सुरुवात केली. हा शपथविधी सोहळा म्हणजे प्राथमिक संपर्क जोडण्याचा मार्ग होता. त्याद्वारे आंतरराष्ट्रीय परिषेदतून अनेक भेटी आणि भेटींद्वारे चर्चा, देवाणघेवाण ही एक उत्तम संधी ठरली. ऑगस्ट २०१४ रोजी नरेंद्र मोदींनी नेपाळला भेट दिली. ही भेट अनेक अर्थाने ऐतिहासिक ठरली. सतरा वर्षांनंतर भारतीय पंतप्रधानांनी ही भेट दिली. नेपाळमध्ये भूकंप झाला. भारताने वेळ न गमावता ताबडतोब लष्कर पाठवून भूकंपामुळे ढिगाऱ्याखाली अडकलेल्या अनेकांना बाहेर काढून मदतकार्य केले. भारताने दिलेले आश्वासन पाळत नेपाळमध्ये अनेक प्रकल्पांचे काम सुरू आहे.

स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी बांगलादेशाच्या स्वातंत्र्य संग्रामात मोलाची भूमिका बजावली. १९७४ पासून भूसीमा भारत आणि बांगलादेशातील करार प्रलंबित होता. नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात ४०९६ कि. मी.च्या सीमा रेषेचा प्रश्न सोडवला गेला आणि ५० हजार जनतेला नवीन ओळख मिळाली. त्यामुळे बंडखोरांच्या कारवाया, मानवी व्यापार, अवैध घुसखोरी, तस्करी रोखण्यात सीमेची निर्मिती महत्त्वपूर्ण ठरली.[६] अफगाणिस्तानमधील घुसखोरी ही भारताच्या दृष्टिकोनातून चिंतेची बाब आहे. अफगाणिस्तानमधील राजकीय बदलामुळे नाटो सैन्य आता माघार घेत आहेत. तेथील राजकीय स्थैर्य आणि मैत्री भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात द्विपक्षीय करार झाला आहे. त्यानुसार भारताने २०० कोटी डॉलर अफगाणिस्तानला दिले आहेत. यात पायाभूत सुविधा, विकास, लोकशाही बळकट करणे आणि देशातील राजकीय स्थैर्य टिकविणे हा या मागाचा हेतू आहे. जानेवारी २०१५ मध्ये श्रीलंकेत नवीन सरकार आले. ''श्रीलंकेत मैत्रीपाल सिनिसेना सरकार स्थापन करण्यात भारतीय इंटेलिजन्स RAW ची प्रमुख भूमिका होती.''[७] प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी श्रीलंकेला १३ मार्च २०१५ रोजी भेट दिली. प्रधानमंत्री द्विपक्षीय वार्तालाप करताना म्हणाले की, ''भारत श्रीलंकेला ३१८ मिलियन अमेरिकन डॉलर कर्ज देऊन श्रीलंकेतील रेल्वे क्षेत्रात सुधारणा करणार आहे. त्याचबरोबर २७ हजार घरांचे निर्माण भारताने श्रीलंकेत केले आहे.''[८] भारतीय रिझर्व्ह बँक आणि सेंट्रल बँक ऑफ श्रीलंका यांच्यात १.५ बिलियन अमेरिकी डॉलर मुद्रा विनिमय करार करण्यात आला. यामुळे श्रीलंकेतील रुपया स्थिर राहण्यास मदत होईल.

मुस्लीम लिगचे संस्थापक महंमदअली जिना यांच्या संकल्पनेतून धर्माच्या आधारावर स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती झाली. परराष्ट्र व्यवहारातलं हत्यार म्हणून आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांना आश्रय देणं, दहशतवादी गटांना तयार करणं, प्रशिक्षण देणं, अर्थपुरवठा करणं आणि गरजेनुसार भारताच्या विरोधात छू करून सोडणं[९], हे तिथल्या राज्यकर्त्यांचे आणि लष्करी नेतृत्वाचे गुण आहेत. १९८० च्या दशकात पेटवलेली ही आग आता पेटवणाऱ्यांनाच भस्म करू पाहत आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात वादाचे मुद्दे काश्मीर, आतंकवाद, प्रभावी भारतीय सैन्य आहे. पाकिस्तानातील आय.एस.आय., मूलतत्त्ववादी शक्ती व दबाव गट लोकशाही मार्गाने निवडून आलेले दुबळे सरकार, असे पाकिस्तानातील कच्चे दुवे आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि पाकिस्तानाचे प्रधानमंत्री नवाज शरीफ यांच्यात डिसेंबर २०१५ पर्यंत एकूण पाच भेटी झाल्या आहेत. या भेटी दरम्यान एकूण तीन वेळेस संवाद साधला गेला. १० जुलै २०१५ रोजी ऊफा येथे झालेल्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनाइजेशन समितीत दोघांनी परस्परांची भेट घेत पुढील वाटचालींची घोषणा केली.[१०] सर्वप्रथम दोन्ही देशांच्या सुरक्षा सल्लागारांसोबत दिल्ली येथे आतंकवादावर चर्चा अपेक्षित होती. नंतर विदेश सचिव एकमेकांना भेट देतील असे ठरले.

३० नोव्हेंबर २०१५ रोजी फ्रांसमधील जलावायू परिवर्तन संमेलनात नरेंद्र मोदींनी नवाज शरीफ यांची भेट घेतली. प्रसारमाध्यमातून आलेल्या बातमीनुसार ही भेट अनधिकृत होती व फक्त दोनच मिनिट दोघांनी संवाद साधला.[११] यानंतर २५ डिसेंबर २०१५ रोजी प्रधानमंत्री नवाज शरीफ यांना वाढदिवसाचा शुभेच्छा संदेश देण्यासाठी आणि नातीच्या लग्नसमारंभात उपस्थित राहण्यासाठी अचानक पंतप्रधान नरेंद्र मोदी पाकिस्तानच्या धर्तीवर पोहोचले. ही भेट अचानक नसून एक महिन्यापूर्वी झालेल्या दोन मिनिटाच्या कुटनीती संवादाचे यश होते. या भेटीचे पडसाद भारतात नवीन वर्षाच्या सुरुवातीला पठाणकोट हल्ल्यात दिसले.

**सारांश :**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आक्रमक परराष्ट्र धोरण अंगीकारले आहे. या धोरणामुळे नेहरूंच्या पंचशील धोरणाची जागा आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान, संवाद, समृद्धी, संस्कृती आणि सुरक्षा या नीतीने घेतली आहे. भारताने अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, जर्मनी, कॅनडा यांच्याशी अणुसहकार्याच्या आघाडीवर लक्षणीय प्रगती केली. विदेश नीतीचा 'मेक इन इंडिया' द्वारे भारतीय अर्थव्यवस्थेला हातभार लावून जगात सर्वात वेगवान वाढणारी अर्थव्यवस्था आणि गुंतवणुकीसाठी सर्वात आकर्षक स्थळ म्हणून झालेली प्रतिमा हे नरेंद्र मोदी यांच्या विदेश नीतीला लाभलेले यश आहे. अमेरिका, चीन, रशिया या जगातील बलाढ्य देशांशी संबंध जोडताना मोदींनी परस्पर हितसंबंधांवर भर दिला. 'लुक ईस्ट' या नीतीमुळे अनेक राष्ट्रांशी पुन्हा नव्याने संबंध प्रस्थापित करण्यात आले. भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्षे झाली असली तरी नरेंद्र मोदी भारताचे असे पहिले पंतप्रधान आहेत की, ज्यांनी मंगोलिया देशाला प्रथम भेट दिली. मंगोलिया हा देश आशिया आणि प्रशांत महासागराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण देश आहे.

**संदर्भ सूची :**


१. दत्त व्ही. पी., स्वतंत्र भारत की विदेश निती राष्ट्रीय पुस्तक न्यास, नई दिल्ली, २००१, पृ.क्र.०१.
२. BULLETIN UNIQUE ACADEMY विशेष लेख परराष्ट्र धोरणाची बदलाची दिशा-दिवाळी विशेषांक नोव्हेंबर २०१५, पृ. क्र. १४५, १४१.
३. www.mea.gov.in/access 28-01-2016.
४. www.mea.gov.in/access 28-01-2016.
५. www.dainikbhaskar.com/access 11-01-2016.
६. योजना जुलै २०१५.
७. www.dainikbhaskar.com/access 25-12-2015.
८. प्रधानमंत्री श्रीलंका दौऱ्यावर असताना प्रसारमाध्यमांशी केलेला संवाद १३ मार्च २०१५.
९. दैनिक सकाळ, दहशतीचा चक्रव्यूह, श्रीराम पवार, सप्तरंग रविवार, २४ जानेवारी २०१६, पृ. क्र. ०१.
१०. इंडिया टू डे - २० जानेवारी २०१६, पृ. क्र. १३.
११. किन्ना पृ. क्र. १३.